| | |
|---|---|
| विषय क्र.०१. दि.३०,नोव्हेंबर, २०२१. | नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील वाशी विभागांतर्गत सार्वजनिक व सामुदायिक शौचालयांची सर्वसमावेशक दैनंदिन साफसफाई, देखभाल व दुरुस्ती कामाचे मे. चुडासामा समाज कल्याण संस्था यांचे दि. ०१/०२/२०२० ते दि. ०७/१०/२०२१ या कालावधीचे देयक अदायगीस कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत, आयुक्तांचे दिनांक २९/११/२०२१, चे पत्र जा. क्र. नमुंमपा/परि-१/१२६९/२०२१. |
| ठराव क्र. १५९४. | "उपरोक्त संदर्भात नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील वाशी विभागांतर्गत सार्वजनिक व सामुदायिक शौचालयांची सर्वसमावेशक दैनंदिन साफसफाई, देखभाल व दुरुस्ती कामाचे मे. चुडासामा समाज कल्याण संस्था यांचे दि. ०१/०२/२०२० ते दि. ०७/१०/२०२१ या कालावधीचे देयक अदायगीस कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत, प्रस्तावित केल्याप्रमाणे सदर कामाकरीता मे. चुडासामा समाज कल्याण संस्था यांना दिलेल्या कार्यादेशाची मुदत दि. १४/०२/२०२० रोजी संपुष्टात आलेली असून त्यांनी प्रत्यक्षात दि. ०७/१०/२०२१ रोजीपर्यंत काम केलेले असल्यामुळे दि. ०१/०२/२०२० ते दि. ०७/१०/२०२१ या कालावधीतील देयक रक्कम रु. ४९,६७,४३५/- (अक्षरी रुपये एकोणपन्नास लक्ष सदुसष्ट हजार चारशे पस्तीस मात्र) एवढ्या रक्कमेस प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ७३(क) अन्वये मा.आयुक्त तथा प्रशासक यांची प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यात यावी." |
| निर्णय : | ठराव करण्यात येतो की,<br>नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील वाशी विभागांतर्गत सार्वजनिक व सामुदायिक शौचालयांची सर्वसमावेशक दैनंदिन साफसफाई, देखभाल व दुरुस्ती कामाचे मे. चुडासामा समाज कल्याण संस्था यांचे दि. ०१/०२/२०२० ते दि. ०७/१०/२०२१ या कालावधीचे देयक अदायगीस कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत, सादर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले आहे.<br>त्यानुसार विषय क्रमांक ०१ ठराव क्रमांक १५९४ अन्वये, प्रस्तावित केल्याप्रमाणे सदर कामाकरीता मे. चुडासामा समाज कल्याण संस्था यांना दिलेल्या कार्यादेशाची मुदत दि. १४/०२/२०२० रोजी संपुष्टात आलेली असून त्यांनी प्रत्यक्षात दि. ०७/१०/२०२१ रोजीपर्यंत काम केलेले असल्यामुळे दि. ०१/०२/२०२० ते दि. ०७/१०/२०२१ या कालावधीतील देयक रक्कम रु. ४९,६७,४३५/- (अक्षरी रुपये एकोणपन्नास लक्ष सदुसष्ट हजार चारशे पस्तीस मात्र) एवढ्या रक्कमेस प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ७३(क) अन्वये मा.आयुक्त तथा प्रशासक यांची प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यात येत आहे. |

सही/-
(चित्रा बाविस्कर)
नगरसचिव
नवी मुंबई महानगरपालिका

सही/-
(अभिजीत बांगर)
आयुक्त तथा प्रशासक
नवी मुंबई महानगरपालिका

<table>
<tr><td>विषय क्र.०२.<br>दि.३०,नोव्हेंबर,<br>२०२१.</td><td>आपत्ती व्यवस्थापन विभागामार्फत नमुंमपा-मुख्यालय इमारतीच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातून सुरक्षा उपकरणे खरेदी करणेबाबत, आयुक्तांचे दिनांक ३०/११/२०२१, चे पत्र जा. क्र. नमुंमपा/आ.व्य./५७६/२०२१.</td></tr>
<tr><td>ठराव क्र. १५९५.</td><td>"उपरोक्त संदर्भात आपत्ती व्यवस्थापन विभागामार्फत नमुंमपा-मुख्यालय इमारतीच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातून सुरक्षा उपकरणे खरेदी करणेबाबत, प्रस्तावित केल्याप्रमाणे नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालय इमारत ही मुख्य प्रशासकीय इमारत असून या ठिकाणी मा. मंत्री, मा.खासदार, मा.आमदार, सन्मा. नगरसेवक तसेच केंद्र व राज्य शासन स्तरावरील विविध मान्यवर व्यक्ती भेटीसाठी येत असतात. सदर मुख्यालयामध्ये मा. आयुक्त, मा. महापौर, उपमहापौर, स्थायी समीती अध्यक्ष, सभागृह नेता, विरोधी पक्ष नेता, सर्व पक्ष प्रतोद, अतिरिक्त आयुक्त (१) व अतिरिक्त आयुक्त (२) तसेच इतर सर्व विभाग प्रमुखांचे कार्यालये आहेत.<br><br>सदर मुख्यालयाचे ठिकाण हे खाडी किनारी असल्याने समुद्रमार्गी दहशतवादी तसेच इतर समाजकंटकाकडून होणाऱ्या हल्ल्याची शक्यता नाकारत येत नाही. नमुंमपा मुख्यालयावर येणारे मोर्चे व नजिकच्या काळात येणाऱ्या महानगरपालिकेच्या आगामी निवडणुका लक्षात घेता मुख्यालयाची सुरक्षा व्यवस्था अधिक सक्षम व काटेकोर करण्याच्या दृष्टीने मुख्यालयासाठी विशेष सुरक्षा यंत्रणा कार्यरत असणे आवश्यक आहे.<br><br>नवी मुंबई महानगरपालिकेने महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ (MSSC) यांचेकडून मुख्यालय इमारतीचे सुरक्षा परिक्षण करण्यात आलेले असून सुरक्षा परिक्षणाअंती मुख्यालय इमारतीचे सुरक्षेच्या दृष्टीकोणातुन अद्यावत सुरक्षा उपकरणांची आवश्याकता असल्याचे कळविलेले आहे.<br><br>सदर उपकरणामार्फत मुख्यालयात येणाऱ्या नागरीक व अभ्यांगत यांचे सामान न उघडता तपासणी होवून धारदार शस्त्रे जसे चाकू, बॉम्ब सदृश्य वस्तु व हत्यारे यांचे स्कॅन होवून मॉनिटरद्वारे सुरक्षा रक्षकांना दिसणार आहे. त्यामुळे, मुख्यालयातील सुरक्षा रक्षकांद्वारे नागरीकांचे गाडी तसेच सामान न उघडता तपासणी होईल त्याचप्रमाणे मुख्यालयात येणाऱ्या मान्यवरांच्या वाहनांची देखील न थांबविता तपासणी करता येईल त्यामुळे वेळेची बचत होवून इमारतीची सुरक्षा अधिक सक्षम होण्यास मदत होणार आहे.<br><br>तरी, आपत्ती व्यवस्थापन विभागामार्फत नवी मुंबई महानगरपालिकेचे मुख्यालय इमारतीचे सुरक्षेकरीता महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ या शासकीय संस्थने केलेल्या शिफाशीनुसार मुख्यालयात येणाऱ्या नागरीक व अभ्यांगत यांचे वाहन/ सामान तपासणीसाठी वरील सुरक्षा उपकरण खरेदी करणे करीता होणारा सर्व करासह एकूण अंदाजे खर्च रू. १,४३,१३,४००/- (अक्षरी रूपये एक कोटी त्रेचाळीस लक्ष तेरा हजार चारशे मात्र) आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा व साहित्य खरेदी या लेखाशिर्षकातील तरतुदीमधील प्रस्तावित अंदाजित खर्च करण्याकरीता प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, मा.आयुक्त तथा प्रशासक यांची प्रशासकीय मान्यता देण्यात यावी."</td></tr>
<tr><td>निर्णय :</td><td>ठराव करण्यात येतो की,<br>आपत्ती व्यवस्थापन विभागामार्फत नमुंमपा-मुख्यालय इमारतीच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातून सुरक्षा उपकरणे खरेदी करणेबाबत, सादर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले आहे.<br><br>त्यानुसार विषय क्रमांक ०२ ठराव क्रमांक १५९५ अन्वये, प्रस्तावित केल्याप्रमाणे नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालय इमारत ही मुख्य प्रशासकीय इमारत असून या ठिकाणी मा. मंत्री, मा.खासदार, मा.आमदार, सन्मा. नगरसेवक तसेच केंद्र व राज्य शासन स्तरावरील विविध मान्यवर व्यक्ती भेटीसाठी येत असतात. सदर मुख्यालयामध्ये मा. आयुक्त, मा. महापौर, उपमहापौर, स्थायी समीती अध्यक्ष, सभागृह नेता, विरोधी पक्ष नेता, सर्व पक्ष प्रतोद, अतिरिक्त आयुक्त (१) व अतिरिक्त आयुक्त (२) तसेच इतर सर्व विभाग प्रमुखांचे कार्यालये आहेत.<br><br>सदर मुख्यालयाचे ठिकाण हे खाडी किनारी असल्याने समुद्रमार्गी दहशतवादी तसेच इतर समाजकंटकाकडून होणाऱ्या हल्ल्याची शक्यता नाकारत येत नाही. नमुंमपा मुख्यालयावर येणारे मोर्चे व नजिकच्या काळात येणाऱ्या महानगरपालिकेच्या आगामी निवडणुका लक्षात घेता मुख्यालयाची सुरक्षा व्यवस्था अधिक सक्षम व काटेकोर करण्याच्या दृष्टीने मुख्यालयासाठी विशेष सुरक्षा यंत्रणा कार्यरत असणे आवश्यक आहे.<br><br>नवी मुंबई महानगरपालिकेने महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ (MSSC) यांचेकडून मुख्यालय इमारतीचे सुरक्षा परिक्षण करण्यात आलेले असून सुरक्षा परिक्षणाअंती मुख्यालय इमारतीचे सुरक्षेच्या दृष्टीकोणातुन अद्यावत सुरक्षा उपकरणांची आवश्याकता असल्याचे कळविलेले आहे.<br><br>
<table>
<tr><th>अ.क्र</th><th>सुरक्षा यंत्राचा/ उपकरणाचा तपशिल</th><th>नग</th><th>उपयोग</th></tr>
<tr><td>१</td><td>X-Ray Baggage Scanning Machine (6040 Model) with UV Disinfection Tunnel</td><td>२</td><td>१. या उपकरणामार्फत मुख्यालयात येणारे सर्व पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी व अभ्यांगत नागरीकांचे सामानाची X-Ray द्वारे तपासणी होवून धातुची हत्यारे, बॉम्ब सदृश्य वस्तुंचे पहाणी करण्यास येथील सुरक्षा रक्षकांना करता येईल.<br><br>२. त्याचप्रमाणे कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव विचारात घेता कर्मचारी/अधिकारी/अभ्यांगत यांच्याकडील पिशवी/ ऑफीस बॅग / प्रवासी बॅग व इतर वस्तू मशिनमधुन पुर्णपणे सॅनिटाइझ होऊन बाहेर येईल त्यामुळे कोरोनो विषाणूचा धोका टळण्यास काही प्रमाणात मदत होईल<br><br>३. नवी मुंबई महानगरपालिकेचे मुख्यालयाचे महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ या शासकिय संस्थेने सुरक्षा परिक्षण अंतर्गत पाहणी करून पृ. क्र. प/ नुसार मुख्यालय इमारतीचे तळमजला कॅप्सुल लिफ्टसमोर व स्वागतकक्ष या २ ठिकाणी X-ray Baggage Inspection System मशिन लावण्याकरीता शिफारस केलेली आहे.<br>४. सदर उपकरण मुख्यालयाचे बेसमेंट कॅप्सुल लिफ्ट जवळील प्रवेशव्दार व मुख्यालयाच्या सिंहाजवळील प्रवेशव्दार या ठिकाणी आस्थापित करणेबाबत प्रस्तावित आहे.</td></tr>
<tr><td>२</td><td>UNDER VHECAL SERVIVAL SYSTEM (UVSS)</td><td>१</td><td>१. या उपकरणामार्फत मुख्यालयात येणारे सर्व प्रकारचे वाहनांचे बॉम्ब सदृश्य वस्तुंचे स्कॅन होते तसेच वाहनातील वाहन चालकांचे फोटो, वाहन प्रकार व वाहन क्रमांकाचे फोटो संग्रहीत होत असल्याने मुख्यालयात येणारे सर्व वाहनांचे जाणे व येणेचे वेळ नोंद राहणार आहे. जेणेकरून, मुख्यालय इमारतीचे सुरक्षा सक्षम होण्यास मदत होणार आहे.</td></tr>
</table>
</td></tr>
</table>

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | **VISITOR MANAGEMENT SYSTEM WITH PC, WEB CAM SOFTWARE (GET PASS) SYSTEM** | १ | १. मुख्यालयाच्या मुख्य प्रवेशव्दारावर नागरिक व अभ्यांगत यांची सर्व माहिती उदा. कामाचे स्वरुप काय? कोणत्या विभास भेटावयाचे आहे? कोणत्या अधिकाऱ्यास भेटावयाचे आहे? कोठुन आला? अशा प्रकारची माहिती घेऊन व चोकशी करुन संबंधित व्यक्तीचे फोटो आय डी तपासून व त्याचे कॅमेरॅच्या सहाय्याने छायाचित्र घेऊन ई- पास देऊन प्रवेश दिला जाईल.<br>२. विझिटर सिस्टममुळे कर्मचारी व अभ्यांगत यांच्या येण्याचे व जाण्याच्या वेळा निश्चितपणे कळू शकेल. |
| ४ | **POLE DETECTOR** | २ | १. मुख्यालयात येणारे VIP व VVIP इतर मान्यवर व्यक्ती हे DFMD मधुन प्रवेश करत नसल्याने सुरक्षेच्या दृष्टीकोनातून DFMD ऐवजी प्रवेशव्दारावर पोल डिटेक्टर लावल्यास त्याद्वारे तपासणी होवून धातुची हत्यारे, बंदुके अशा प्रकारची हत्यारे घेऊन मुख्यालयात महत्वाच्या ठिकाणी प्रवेश करता येणार नाही. व त्याव्दारे तपासणी करणे सोयीस्कर होईल. सदर उपकरण मुख्यालयाचे बेसमेंट कॅप्सुल लिफ्ट जवळील प्रवेशव्दार व मुख्यालयाच्या सिंहाजवळील प्रवेशव्दार या ठिकाणी आस्थापित करणेबाबत प्रस्तावित आहे. |

त्याअनुषंगाने, नामांकित कंपनीमार्फत सुरक्षा उपकरणांच्या पायाभूत किंमतीचा तपशील मागविण्यात आलेला असुन, तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | सुरक्षा यंत्राचा/ उपकरणाचा तपशिल | नग | अंदाजे रक्कम |
|---|---|---|---|
| १ | **X-Ray Baggage Scanning Machine (6040 Model) with UV Disinfection Tunnel** | **2** | **5080000** |
| २ | **Under Vehicale Scanning System (UVSS) With Automatic Number Plate Reading System (ANPRS)** | **1** | **4500000** |
| ३ | **VISITOR MANAGEMENT SYSTEM WITH PC, WEB CAM SOFTWARE (GET PASS) SYSTEM** | **1** | **650000** |
| ४ | **POLE DETECTOR** | **2** | **1900000** |
| | **Total** | **-** | **12130000** |
| | **GST 18%** | **-** | **2183400** |
| | एकुण | **-** | **14313400** |

सदर उपकरणामार्फत मुख्यालयात येणाऱ्या नागरीक व अभ्यांगत यांचे सामान न उघडता तपासणी होवून धारदार शस्त्रे जसे चाकू, बॉम्ब सदृश्य वस्तु व हत्यारे यांचे स्कॅन होवून मॉनिटरद्वारे सुरक्षा रक्षकांना दिसणार आहे. त्यामुळे, मुख्यालयातील सुरक्षा रक्षकांद्वारे नागरीकांचे गाडी तसेच सामान न उघडता तपासणी होईल त्याचप्रमाणे मुख्यालयात येणाऱ्या मान्यवरांच्या वाहनांची देखील न थांबविता तपासणी करता येईल त्यामुळे वेळेची बचत होवून इमारतीची सुरक्षा अधिक सक्षम होण्यास मदत होणार आहे.

तरी, आपत्ती व्यवस्थापन विभागामार्फत नवी मुंबई महानगरपालिकेचे मुख्यालय इमारतीचे सुरक्षेकरीता महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ या शासकीय संस्थने केलेल्या शिफाशीनुसार मुख्यालयात येणाऱ्या नागरीक व अभ्यांगत यांचे वाहन/ सामान तपासणीसाठी वरील सुरक्षा उपकरण खरेदी करणे करीता होणारा सर्व करासह एकूण अंदाजे खर्च रू. १,४३,१३,४००/- (अक्षरी रूपये एक कोटी त्रेचाळीस लक्ष तेरा हजार चारशे मात्र) आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा व साहित्य खरेदी या लेखाशिर्षकातील तरतुदीमधील प्रस्तावित अंदाजित खर्च करण्याकरीता प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, मा.आयुक्त तथा प्रशासक यांची प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

**सही/-**
**(चित्रा बाविस्कर)**
**नगरसचिव**
**नवी मुंबई महानगरपालिका**

**सही/-**
**(अभिजीत बांगर)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**नवी मुंबई महानगरपालिका**

| | |
|---|---|
| विषय क्र.०३. दि.३०,नोव्हेंबर, २०२१. | नवी मुंबई महानगरपालिका आरोग्य विभागात करार पध्दतीने (कंत्राटी) निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात विशेषज्ञ वैद्यकीय सल्लागार अधिकारी (बधिरीकरण तज्ञ) यांच्या नेमणूकीबाबत, आयुक्तांचे दिनांक ३०/११/२०२१, चे पत्र जा. क्र. नमुंमपा/आरोग्य/१३२५०/२०२१. |

**ठराव क्र. १५९६.**

"उपरोक्त संदर्भात नवी मुंबई महानगरपालिका आरोग्य विभागात करार पध्दतीने (कंत्राटी) निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात विशेषज्ञ वैद्यकीय सल्लागार अधिकारी (बधिरीकरण तज्ञ) यांच्या नेमणूकीबाबत, प्रस्तावित केल्याप्रमाणे रुग्णालयात रुग्णांना सेवा देण्यासाठी उपलब्ध असलेल्या विभागाकरिता तज्ञ वैदयकिय अधिकारी यांची कमतरता भासत असुन पुर्ण क्षमतेने रुग्णालय सुरु करण्यासाठी तज्ञ वैदयकिय अधिका-यांची नितांत आवश्यकता आहे.

१) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ५३ (१) अन्वये सहा.आयुक्त पदाची समतुल्य किंवा त्योपक्षा उच्च दर्जाच्या पदावर मग ती तात्पुरती असोत किंवा कायम नेमणूक करण्याचे अधिकार महापालिकेला विहित आहेत, अशी नमूद आहे.

२) सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनबँड रु.१५६००-३९१०० ग्रेड वेतन ५४००/- तज्ञ वैदयकिय अधिकारी हे पद सहा.आयुकत पदापेक्षा उच्च दर्जाचे असल्यामुळे सदरच्या नेमणूका मा.स्थायी समितीच्या मान्यतेने करणे आवश्यक आहे.

तज्ञ वैदयकिय अधिकारी यांना रुग्णालयाच्या आवश्यकतेनुसार निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सहा महिन्याच्या कालावधी करीता नियुक्ती आदेश देण्यात येत असतात.

रुग्णालयातील बधिरीकरण पदाचे एकूण १७ पदे मंजूर असून १२ कायम भरलेली असून करारवर २ बधिरीकरण तज्ञ कार्यरत असून करारावरील भरलेली पदे वगळता रिक्त पदे ५ आहेत.

राजमाता जिजाऊ रुग्णालय, ऐरोली येथे कार्यरत डॉ. मिनाक्षी ढोले, बधिरीकरण तज्ञ यांचा करार पध्दतीवर कालावधी संपुष्टात येत आहे. तसेच डॉ. स्मृती वॉरियर यांनी बधिरीकरण तज्ञ या पदावर नियुक्ती मिळणेकरीता अर्ज सादर केला आहे.

| अ.क्र. | तज्ञ वैदयकिय अधिकारी (बधिरीकरण तज्ञ ) नाव | रुग्णालयाचे नाव | मासिक ठोकमानधन रु/-वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| १. | डॉ. तरीन मिथेल | माता बाल रुग्णालय, बेलापूर | ७५,०००/- |
| २. | डॉ. मिनाक्षी ढोले | सार्वजनिक रुग्णालय, ऐरोली | ७५,०००/ |
| ३. | डॉ. समृध्दी वॉरियर | मॉंसाहेब मिनाताई ठाकरे रुग्णालय, नेरुळ | ७५,०००/ |

नवी मुंबई महानगरपालिकेची विद्यमान मुदत दि.०७/०५/२०२० रोजी संपुष्टात येऊन महानगरपालिकेच्या प्रशासक पदाचा कार्यभार मा. आयुक्त यांनी स्विकारला आहे.

करार पध्दतीवरील सहा महिन्याचा कालावधी संपुष्टात आलेनंतर नमुंमपा रुग्णालयातील तज्ञ वैद्यकीय अधिकारी यांची निकड लक्षात घेता उपरोक्त नमूद अ.क्र. १ व २ मधील तज्ञ वैद्यकीय अधिकारी कार्यरत राहिल्यास नियुक्ती आदेश संपुष्टात आल्यानंतर तीन दिवसांचा खंड देवून नियुक्ती देण्याची आवश्यकता आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे प्रस्तावित केलेल्या एकूण-०३ तज्ञ वैद्यकीय अधिकारी यांना ठोक मानधनावर, तात्पुरत्या स्वरुपात करार पध्दतीवर ६ (सहा) महिन्याकरीता एकत्रित मानधन रु. ७५,०००/- प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, मधील कलम ५३(१) अन्वये नव्याने नियुक्ती देण्याकरीता मा. आयुक्त तथा प्रशासक यांची मान्यता देण्यात यावी."

**निर्णय :**

ठराव करण्यात येतो की,

नवी मुंबई महानगरपालिका आरोग्य विभागात करार पध्दतीने (कंत्राटी) निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात विशेषज्ञ वैद्यकीय सल्लागार अधिकारी (बधिरीकरण तज्ञ) यांच्या नेमणूकीबाबत, सादर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले आहे.

त्यानुसार विषय क्रमांक ०३ ठराव क्रमांक १५९६ अन्वये, प्रस्तावित केल्याप्रमाणे रुग्णालयात रुग्णांना सेवा देण्यासाठी उपलब्ध असलेल्या विभागाकरिता तज्ञ वैदयकिय अधिकारी यांची कमतरता भासत असुन पुर्ण क्षमतेने रुग्णालय सुरु करण्यासाठी तज्ञ वैदयकिय अधिका-यांची नितांत आवश्यकता आहे.

१) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ५३ (१) अन्वये सहा.आयुक्त पदाची समतुल्य किंवा त्योपक्षा उच्च दर्जाच्या पदावर मग ती तात्पुरती असोत किंवा कायम नेमणूक करण्याचे अधिकार महापालिकेला विहित आहेत, अशी नमूद आहे.

२) सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनबँड रु.१५६००-३९१०० ग्रेड वेतन ५४००/- तज्ञ वैदयकिय अधिकारी हे पद सहा.आयुकत पदापेक्षा उच्च दर्जाचे असल्यामुळे सदरच्या नेमणूका मा.स्थायी समितीच्या मान्यतेने करणे आवश्यक आहे.

तज्ञ वैदयकिय अधिकारी यांना रुग्णालयाच्या आवश्यकतेनुसार निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सहा महिन्याच्या कालावधी करीता नियुक्ती आदेश देण्यात येत असतात.

रुग्णालयातील बधिरीकरण पदाचे एकूण १७ पदे मंजूर असून १२ कायम भरलेली असून करारवर २ बधिरीकरण तज्ञ कार्यरत असून करारावरील भरलेली पदे वगळता रिक्त पदे ५ आहेत.

राजमाता जिजाऊ रुग्णालय, ऐरोली येथे कार्यरत डॉ. मिनाक्षी ढोले, बधिरीकरण तज्ञ यांचा करार पध्दतीवर कालावधी संपुष्टात येत आहे. तसेच डॉ. स्मृती वॉरियर यांनी बधिरीकरण तज्ञ या पदावर नियुक्ती मिळणेकरीता अर्ज सादर केला आहे.

| अ.क्र. | तज्ञ वैदयकिय अधिकारी (बधिरीकरण तज्ञ ) नाव | रुग्णालयाचे नाव | मासिक ठोकमानधन रु/-वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| १. | डॉ. तरीन मिथेल | माता बाल रुग्णालय, बेलापूर | ७५,०००/- |
| २. | डॉ. मिनाक्षी ढोले | सार्वजनिक रुग्णालय, ऐरोली | ७५,०००/ |
| ३. | डॉ. समृध्दी वॉरियर | माँसाहेब मिनाताई ठाकरे रुग्णालय, नेरुळ | ७५,०००/ |

नवी मुंबई महानगरपालिकेची विद्यमान मुदत दि.०७/०५/२०२० रोजी संपुष्टात येऊन महानगरपालिकेच्या प्रशासक पदाचा कार्यभार मा. आयुक्त यांनी स्विकारला आहे.

करार पध्दतीवरील सहा महिन्याचा कालावधी संपुष्टात आलेनंतर नमुंमपा रुग्णालयातील तज्ञ वैद्यकीय अधिकारी यांची निकड लक्षात घेता उपरोक्त नमूद अ.क्र. १ व २ मधील तज्ञ वैद्यकीय अधिकारी कार्यरत राहिल्यास नियुक्ती आदेश संपुष्टात आल्यानंतर तीन दिवसांचा खंड देवून नियुक्ती देण्याची आवश्यकता आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे प्रस्तावित केलेल्या एकूण-०३ तज्ञ वैद्यकीय अधिकारी यांना ठोक मानधनावर, तात्पुरत्या स्वरुपात करार पध्दतीवर ६ (सहा) महिन्याकरीता एकत्रित मानधन रु. ७५,०००/- प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, मधील कलम ५३(१) अन्वये नव्याने नियुक्ती देण्याकरीता मा. आयुक्त तथा प्रशासक यांची मान्यता देण्यात येत आहे.

सही/-
(चित्रा बाविस्कर)
नगरसचिव
नवी मुंबई महानगरपालिका

सही/-
(अभिजीत बांगर)
आयुक्त तथा प्रशासक
नवी मुंबई महानगरपालिका